दूरध्वनी क्रमांक :- ०२०-२५५०११२३
अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे - ४११ ००५
कार्यालयीन वेळ :- सकाळी १०.०० ते ०५.४५
जेवणाची सुट्टी :- दुपारी ०२.०० ते ०२.३०
खात्याचा ई मेल :-
dmcgeneral@punecorporation.org
जावक क्रमांक :-अपिल/४०/२०१६/उआ(सा.प्र.)/ ८८८
दिनांक :- ९४/१२/२०१६

**अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचे कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**अपिल क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा. तथा उप आयुक्त (सा.प्र.)/अपिल/४०/२०१६**

**अपिलकर्त्याचे नांव व पत्ता :-**
श्री.गोविंद मांगीलाल राठी,
११ ब, शिवाजीनगर,शक्ती रूटील फर्निचर शेजारी,
पुणे - ४११ ००५.

**जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा :-**
श्री.शाम तारु, प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.गोविंद मांगीलाल राठी - अपिलार्थी
विरुध्द
जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

अपिलकर्ता श्री. गोविंद मांगीलाल राठी यांनी दिनांक २१/०९ /२०१६ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग , पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करून **मीटर रिडर नेमणूक प्रकरणी सन २००१ साली झालेल्या पुणे महानगरपालिका कामगार युनियन व पी एम सी एम्प्लॉईज युनियनबरोबर महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४८१ आय मधील तरतूदीनुसार व महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ मधील तरतूदीनुसार न्यायप्रविष्ठ सन्मानीय तडजोडीनुसार कालबध्द पदोन्नती न देण्यासंदर्भात कागदपत्रे**. अशी माहिती मागीतली आहे.

अपिलार्थी यांना मा. जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग यांनी दि. १९/१०/२०१६ रोजी माहिती पाठविली आहे.

| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २१/९/२०१६ | २०/१०/२०१६ | १९/१०/२०१६ | १९/११/२०१६ |

अपिलकर्ता यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन न दिल्याचे कारण नमूद करुन दिनांक २१/११/२०१६ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| १८/११/२०१६ | २१/११/२०१६ | नाही | - | २९/११/२०१६ |

सदर अपिलाची सुनावणी दिनांक २/१२/२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित केली होती. सुनावणीस अपिलकर्ता श्री.गोविंद राठी हे उपस्थित होते. तसेच श्री. शाम तारू,जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी , आस्थापना विभाग हे उपस्थित होते.

जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशिल :-

| अ.क्र | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १. | मीटर रिडर नेमणूक प्रकरणी सन २००१ साली झालेल्या पुणे महानगरपालिका कामगार युनियन व पी एम सी एम्प्लॉईज युनियनबरोबर महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४८१ आय मधील तरतूदीनुसार व महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ मधील तरतूदीनुसार न्यायप्रविष्ठ सन्मानीय तडजोडीनुसार कालबध्द पदोन्नती न देण्यासंदर्भात कागदपत्रे. | सदरची माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने अर्जदार स्वतः कार्यालयीन वेळेत उपस्थित राहिल्यास प्रशासन ८ कडील अभिलेखे दाखविण्याची व्यवस्था करण्यात येईल व त्यामधून आवश्यक असणाऱ्या अभिलेख्यांच्या प्रतींची मागणी केल्यास त्या प्रतींचे आवश्यक शुल्क मनपा कोष कार्यालयात जमा केल्यानंतर सदरची माहिती उपलब्ध करुन देतायेईल असे आ.क्र.आस्था/७८४०,दि.२१/९/२०१६ चे लगत कळविले आहे.<br>तसेच जा.क्र.जमाअ/आस्था/३९१४,.१०/१०/२०१६ न्वये काही माहिती नगरसचिव कार्यालयाशी संबंधित असल्याने मूळ अर्ज नगरसचिव कार्यालयाकडे वर्ग करण्यात आला असल्याचे कळविण्यात आले आहे. |

**विवेचन**

सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता श्री.गोविंद राठी यांनी मुद्दा क्र.१ ते १८ मधील एकाही मुद्याची माहिती मिळाली नसल्याचे सांगीतले.तसेच मुद्दा क्र.१ मध्ये नमूद ठराव रद्द करणेबाबत मा.विधी समिती,मा.स्थायी समिती व मा.मुख्य सभा यांना सादर केलेल्या विषयपत्राची प्रत मिळावी अशी मागणी केली. अपिलार्थी यांनी मागीतलेली माहिती अभिलेखात आढळत नसल्याचे श्री.भोरले,टेबलप्रमुख,प्रशासन -८ यांनी सांगीतले.

**आदेश**

अपिलार्थी यांनी मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केलेला ठराव विखंडीत करणेबाबत सादर केलेले विषयपत्र अभिलेखात आढळून येत नसल्याचा खुलासा जन माहिती अधिकारी,आस्थापना विभाग यांनी केला आहे. जन माहिती अधिकारी,आस्थापना विभाग यांनी दिलेली माहिती योग्य आहे.

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश बोरसे )**
**अपिल प्राधिकारी तथा**
**उप आयुक्त (सामान्य प्रशासन)**
**पुणे महानगरपालिका**

टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय ईमारत, ४ था मजला, पुणे - १ यांचेकडे द्वितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.